दाखल तारीख : २५/०१/१९९९.

नोंदणी तारीख : २५/०१/१९९९.

निकाल तारीख: २९/०२/२०१२.

कालावधी :**१३**वर्षे**०१**महिना**०४**दिवस.

---

**पुष्ठ क्रमांक १ ते १५.**

---

**करा्ड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी : श.सं.धपाटे)

**नियमीत दिवाणी मुकदमा क्रं. ४१/१९९९.**

निशाणी क्रमांक:—

**श्री. शहाजी रामकृष्ण वाघ उ.व.४०**
धंदा—शेती, रा. धावरवाडी, ता.कराड. ....**वादी.**

**विरूध्द**

१. **श्री. सीताराम खाशाबा वाघ, उ.व ६०,**

२. **श्री. तात्याबा खाशाबा वाघ, उ.व ५८,**

३. **श्री. तानाजी खाशाबा वाघ, उ.व ५६,**

४. **श्री. शंकर खाशाबा वाघ, उ.व ५४,**

५. **श्री. बाबुराव खाशाबा वाघ, उ.व. ५०,**

६. **श्री. विकास बाबुराव वाघ, उ.व ३०,** ...**प्रतीवादी.**

७. **श्री. सतीश बाबुराव वाघ, उ.व २८,**

८. **श्रीमती वत्सला रामकृष्ण वाघ, उ.व ६०,**

९. **श्री. उत्तम रामकृष्ण वाघ, उ.व. ४०,**

१०. **सौ. लता बिरसेन पवार, उ.व. ६५,**
अ.नं. १,२ व ५ धंदा— शेती,
अ.नं. ३ व ४ धंदा— नोकरी,
अ.नं. १,२,५ ते ७ इंदोली, ता. कराड
अ.नं. ३ रा. तारळे, ता. पाटण.
अ.नं. ४ रा. कुर्ला कॅप नं. ४
एब्लॉक, १४० ब्लॉक नं. २८०,
कालीमाता मंदीरा शेजारी, उल्हासनगर—४
जि. ठाणे. अ.नं. ८ व ९ रा. धावरवाडी,
ता. कराड.
अ.नं. १० रा. नांदवळ ता. कोरेगांव. ....**प्रतीवादी.**

११. **विक्रांत राजेंद्र घुटे**
**अ.पा.क. राजेंद्र प्रल्हाद घुटे,**
वय—सज्ञान धंदा—व्यापार
रा. उंब्रज ता. कराड, जि. सातारा.

१२. **सौ. जायदा गफूर पटवेकरी.**
वय—सज्ञान, धंदा— घरकाम
रा. उंब्रज ता. कराड, जि. सातारा.

१३. **श्री. संदीप आबाजी लोकरे**
वय—सज्ञान, धंदा— पेन्शनर
रा. इंदोली ता. कराड जि. सातारा.

---

दावा रूपये—१३०९९/—व विषयाची किंमत रु.— १३०९९/—.

## वाटपा बाबतचा दावा

---

| | | |
|---|---|---|
| **वादी तर्फे विधीज्ञ** | : | **श्री. एस. टी. चव्हाण.** |
| **प्रतिवादी १ ते ७ तर्फे विधीज्ञ** | : | **श्री. एस. डी. मोळावडे.** |
| **प्रतिवादी ८,९,१०तर्फे विधीज्ञ** | : | **श्री. एम. जे. साळुंखे.** |
| **प्रतीवादी ११ तर्फे विधीज्ञ** | : | **श्री. एस. एन. चिंगळे.** |
| **प्रतिवादी १२ तर्फे विधीज्ञ** | : | **श्री. एम. ए. बागवान.** |

## <u>न्या य नि र्ण य</u>

(दिनांक २९/०२/२०१२ रोजी घोषित)

१) वादीने, प्रस्तुतचा दावा, दावा कलम १(अ) ते १(ड) या मिळकतीमधील त्याचा हिस्सा सरस निरस वाटपादव्रारे निश्चीत, वेगळा व तूटक करून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**<u>वादीचा दावा थोडक्यात</u> :—**

२) वादीचे वडील रामकृष्ण व प्रतीवादी क्र. १ ते ५ हे एकमेकाचे सख्खे सावत्र भाऊ—भाऊ आहेत. वाद मिळकत ही वादी प्रतीवादींची वडिलार्जीत एकत्र कुटूंबाचे मालकीची आहे. वाद मिळकतीचे अद्याप—पर्यंत वाटप झालेले नाही. परंतु वाद मिळकतीमधे वादीने त्याचा हिस्सा प्रतीवादींना सरस निरस मानाने वाटून, स्वतंत्र व वेगळा करून मागीतला असता. त्यांनी तो देणेस नकार दिलेने, प्रस्तूतचा दावा दाखल केला आहे. वाद मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे — **<u>१अ)</u>** मौजे इंदोली, ता. कराड जि. सातारा, येथील जमीन मिळकती गट नं. १३१० क्षेत्र ०=०५ आर, १३४८ क्षेत्र १=९९/१=१४ आर, १४०४ क्षेत्र ०.७५ आर, १४१९ क्षेत्र ०=७४ आर, १५०३ क्षेत्र ०=७५ आर, १५१६ क्षेत्र ०.०४ आर, १५३६ क्षेत्र १=४६/०=७१ आर, १५४७ क्षेत्र १=०६/०=०४ आर, १५४८ क्षेत्र २=४५/०=११ आर. **<u>१ब)</u>** मौजे पेरले, ता. कराड जि. सातारा, येथील जमीन मिळकत गट नं. २१८ क्षेत्र १=११ आर व **मौजे इंदोली ता. कराड ग्रामपंचायतीचे हद्दीतील दावा कलम <u>१क</u> मधील नमुद खालील मिळकती:—**

१) पुर्व पश्चिम ५०, दक्षिण उत्तर २५ खूली जागा त्याचा ग्रामपंचायत

मिळकत नं. ९०.

२) पुर्वाभिमुखी १ खण तिघई एकुण ३ खण पत्र्याचे पुर्व—पश्चिम ४० दक्षिणोत्तर ७ याचा ग्रामपंचायत मिळकत नं. ९७.

३) उत्तराभिमुखी ३ खण चौघई पैकी तिघई दुमजली बेंगलोरी कौले व पत्र्याचे बांधकाम दगड माती पक्क्या विटाचे पुर्वपश्चिम १७'.९'' व दक्षिणउत्तर ५० फुट याचा ग्रामपंचायत मिळकत नं. १०७.

४) १ गुंठा पर्डे प्लॉट नं. २९ याचा ग्रामपंचायत मिळकत नं. ४७५१.

**१ड)** एच.एम.टी ट्रॅक्टर, रजी.नंबर एम.एक्स.एक्स ७४६२.

३) वादीचे आजोबा खाशाबा यांना त्यांची प्रथम पत्नी आक्काताई पासुन वादीचे वडील रामकृष्ण हे आपत्य झाले होते. परंतु वादीची आज्जी मयत झाले नंतर, त्याचे आजोबांनी कृष्णाबाई हिचेशी दूसरे लग्न केले. प्रतिवादी १ ते ५ हे वादीची सावत्र आज्जी कृष्णाबाई हिचे पासून झालेली मूले आहेत. वादीचे वडील त्यांचे आईचे मृत्युनंतर आजोळीच राहत होते. त्यांचा मृत्यू १६/३/९२ रोजी झाला. आत्ता पर्यंत वादी प्रतिवादी हे एकत्र कुटूंबातच राहत होते. वाद मिळकतीचे आत्तापर्यंत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. गट नंबर १३१० ही मिळकत वादीचे आजोबा खाशाबा नाना वाघ यांनी पांडूरंग तुकाराम मोहिते यांचेकडून तारीख १३/०६/१९६७ रोजी रक्कम रूपये २५००/— यास खरेदी घेतली होती व गट नंबर १४०४ ही मिळकत वादीचे आजोबांनी मारूती धोंडी चव्हाण यांचेकडून तारीख ०२/०६/१९७० रोजी रक्कम रूपये ७०००/— देवून खरेदी केली होती. वादीचे वडील हयात असतांना वादी व प्रतिवादी १ ते

५ हे एकत्रात वाद मिळकत कसत होते. वादीने दिनांक १३/१०/८८ रोजी प्रतिवादी कडे त्याचा हिस्सा वाटून मागितला असता त्यांनी तो देणेस नकार दिलेने, वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

४) प्रतिवादी कमांक १ ते ७ यांनी (नि. ३७) लगत न्यायालयात हजर होवून कैफियत दाखल केली. त्यांनी वादीचा असलेला नातेसंबंध मान्य करुन त्यात असे नमुद केले आहे की, वादीने दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे केले आहे. दावा मिळकतीत वादी व त्याचे वडिल कधीही राहात नव्हते. वादीस दावा करणेसाठी काहीही कारण घडले नाही. तसेच गेली ५० वर्षापासुन फक्त प्रतिवादी क. १ ते ५ यांचीच दावा मिळकतीत मालकी व कब्जेवहिवाट आहे. सबब वादीने मागणी केले प्रमाणे वाद मिळकती मधील हिस्सा मिळणेस पात्र नसलेने, त्याचा दावा खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

५) अभिलेखावरील कागदोपत्री पूरावा विचारात घेता, माझे पूर्व अधिकारी यांनी (नि.३८) लगत या दाव्याचे अंतिम निर्णयासाठी खालील मुद्दे निश्चित केले, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारण मिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सिध्द केले आहे काय की, तो दावा कलम १(अ) ते १(ड) या मिळकती मधील त्याचा कायदेशीर हिस्सा वेगळा व तुटक करुन कब्जेत मिळणेस पात्र आहे? | ...अंशत:... ......होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | वादीने सिध्द केले आहे का की, तो वाद मिळकती मधील मुव्हेबल मिळकतीत हिस्सा मिळणेस पात्र आहे? | ..नकारार्थी. |
| ३. | खर्चाबाबत काय आदेश? | दावा खर्चासह ..मंजूर. |
| .४. | आदेश व हुकूमनामा काय? | ....अंतिम आदेशाप्रमाणे. |

---

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दा क्रं. १ व ४ बाबत</u>:—

६) मुद्दा क्रं. १ ते ३ हे एकमेकाशी निगडीत असल्यामूळे त्यांची कारणमिमांसा पुनरावृत्ती टाळणेसाठी एकत्रीत खालील प्रमाणे केलेली आहे. या दाव्यातील रोजनाम्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादींनी या दाव्यात कैफियत दाखल केली आहे. परंतु त्या नंतर वारंवार व पुरेशी संधी देवूनही त्यांनी हजर राहुन साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही किंवा उलटतपास घेण्यासाठी मूदतही मागितली नाही. प्रतिवादींनी या दाव्यात काहीही मौखीक किंवा कागदोपत्री पूरावा दाखल न केल्याने फक्त वादीचे वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील मौखिक व कागदोपत्री पूराव्याचे अवलोकन करुन न्यायनिर्णयासाठी वळलो.

७) वादीने या दाव्यात केलेली मागणी प्राबल्याने सिध्द करणेसाठी त्याची स्वतःची साक्ष (नि. ७०) लगत नोंदवली. कागदोपत्री पुराव्यात वादीने मौजे इंदोली ता. कराड येथील गट नंबर १३१० चा ७/१२ उतारा

(नि.४) लगत, गट नंबर १३४८ चा ७/१२ उतारा (नि.५) लगत, गट नंबर १४०४ चा ७/१२ उतारा (नि.६) लगत, गट नंबर १४१९ चा ७/१२ उतारा (नि.७) लगत, गट नंबर १५०३ चा ७/१२ उतारा (नि.८) लगत, गट नंबर १५१६ चा ७/१२ उतारा (नि.९) लगत, गट नंबर १५३६ चा ७/१२ उतारा (नि.१०)लगत, गट नंबर १५४७ चा ७/१२ उतारा (नि.११) लगत, गट नंबर १५४८ चा ७/१२ उतारा (नि.१२) लगत, गट नंबर २१८ चा ७/१२ उतारा (नि.१३) लगत, मिळकत नं. ९० चा नमुना नं. ८ चा उतारा (नि.१४) लगत, मिळकत नं. ९७ चा नमुना नं. ८ चा उतारा (नि.१५) लगत, मिळकत नं. १०७ चा नमुना नं. ८ चा उतारा (नि.१६) लगत, मिळकत नं. ४७५१ चा नमुना नं. ८ चा उतारा (नि.१७) लगत दाखल केलेला आहे. वादीने नि ७१ लगत साक्षी पूरावा संपल्याची पूरशीस दाखल केली. प्रतिवादींनी त्यांचा साक्षीपूरावा या कामी दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादी कं. ८ ते १० यांना संमन्सची बजावणी होऊनही त्यांनी कैफीयत दाखल न केलेने त्यांचे विरूध्द प्रस्तुतचा दावा विना कैफियत चालविणेत आला.

८) वादीने दावा मिळकतीचे वाटप होऊन त्यामधील त्याचा कायदेशीर हिस्सा वेगळा व तुटक करुन कब्जात मिळणेची विनंती केली आहे. त्यासाठी प्रथम वादीने दावा मिळकत ही त्याचे वडीलोत्पार्जीत असलेचे, तसेच त्या मिळकती मधील मागणी केले प्रमाणे हिस्सा मिळणेस तो पात्र असलेचे प्राबल्याने सिध्द करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने त्याची नि. ७० लगत शपथेवर साक्ष नोंदवली. दावा मिळकतीचे उतारे दाखल केले. तसेच दावा मिळकतीमधे असलेल्या सह हिस्सेदारांची

वंशावळ खालील प्रमाणे दाखल केलेली आहे.

नाना वाघ

खाशाबा

पहीली पत्नी आक्काताई व दव्तीय पत्नी कृष्णाबाई (दोघीही मयत)

रामकृष्ण(मयत) सिताराम तात्याबा तानाजी बाबूराव शंकर

वत्सला प्र.वादी १ प्र.वादी २ प्र.वादी ३ प्र.वादी ५ प्र.वादी ४

प्र.वादी ८.

शहाजी उत्तम लता विकास सतीश

वादी प्र.वादी ९ प्र.वादी १० प्र.वादी ६ प्र.वादी ७.

९) वंशावळीचे अवलोकन केले असता, वादी प्रतीवादींचे मुळ पुरुष नाना वाघ. त्यांचा मुलगा खाशाबा वाघ. खाशाबा यांची प्रथम पत्नी आक्काताई व दुसरी पत्नी कृष्णाबाई असलेचे दिसुन येते. खाशाबा यास आक्काताई पासुन वादीचे वडील रामकृष्ण व कृष्णाबाई पासुन प्रतीवादी क्र. १ ते ५ झाले. प्रतीवादी क्र. ६ व ७ ही बाबुराव यांची मुले असुन प्रतीवादी क्र. ८ ते १० हे वादीचे आई, बहीन व भाऊ आहेत. वादीने नोदंवलेल्या वंशावळीबाबत प्रतीवादींचा काहीही आक्षेप नसलेने, ती वंशावळ खरी असलेचे म्हणता येईल.

१०) वादीने त्याचे साक्षीत पुढे असे सांगीतले की, दावा कलम १अ ते दावा कलम १ड या मिळकती वादी व प्रतिवादी यांचे वडीलार्जीत मालकीच्या आहेत. आजतागायत त्या मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वाद मिळकतीत वादीचे वडील रामकृष्ण यांचा १/६ हिस्सा

आहे. त्याचे वडीलांचे हिस्यापैकी, वादीस त्याचा हिस्सा सरस निरस मानाने वाटणी होवून वेगळा मिळावा. त्यासाठी त्याने वाद मिळकतीचे उतारे दाखल केलेले आहेत. ते उतारे पाहीले असता दावा कलम १ अ मधील मिळकतीत वादीचे नावाची नोंद दिसुन येते. परंतु दावा कलम **१ ब** व दावा कलम **१ क** या मिळकतीत वादीचे नावाचा उल्लेख दिसुन येत नाही. तसेच वादीने दावा कलम **१ ड** यात नमुद वाहणाचा काहीही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

११) प्रतीवादीं क्र. १ ते ५ यांनी त्यांचे कैफीयतीत खालीलप्रमाणे परस्पर विरोधी बचाव घेतला की, वाद मिळकतीचे १२/१०/१९८८ साली वाटप झालेले आहे. वाद मिळकती या प्रतीवादी क्र. १ ते ५ यांच्या स्वकष्टार्जीत आहेत. तसेच वाद मिळकतीशी वादी किंवा त्याचे वडीलांचा दावा दाखल करणेपुर्वी ५० वर्षापासुन काहीही संबंध नाही. सबब प्रतीवादी क्र. १ ते ५ हे वाद मिळकतीचे विरुध्द् कब्जाने मालक झालेले आहेत.

१२) प्रतीवादीं क्र. १ ते ५ यांनी त्यांचे कैफीयतीत घेतलेल्या बचावाप्रमाणे जर वाद मिळकती प्रतीवादींच्या स्वकष्टार्जीत असतील, तर त्यांचे वादी किंवा त्याचे पुर्वजांसोबत वाटप होणेचा प्रश्नच नाही. तर मग १९८८ साली कोणत्या मिळकतीचे वाटप, कोणा कोणात झाले हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. जर वाद मिळकती स्वकष्टार्जीत असतील, तर स्वत:चेच मिळकतीत प्रतीवादींना प्रती कब्जाने मालक होणेचा प्रश्नच उदभवत नाही. कारण प्रती कब्जाने मालक होणे म्हणजेच वाद मिळकतीत दुसरे कोणाची तरी मालकी स्वीकारणे होय. प्रतीवादींनी वाद मिळकतीत त्यांची ५०

वर्षापासुन वहीवाट असलेने ते वाद मिळकतीत प्रती कब्जाने मालक झालेचाही बचाव घेतला. परंतु जर वाद मिळकत ही वादी— प्रतीवादींची वडीलोपार्जीत असेल, तर त्या मिळकतीत प्रती कब्जाने मालक होणेचा प्रश्नच उदभवत नाही. कारण वडीलोपार्जीत व सामाईक मिळकतीमध्ये जरी सर्व सह हिस्सेदारांची भौतीक मालकी दिसत नसली, तरी लाक्षणीक रीत्या सर्व सह हिस्सेदारांची मालकी त्या मिळकतीत असतेच असते. यावरुन प्रतीवादींनी घेतलेला बचाव परस्पर विरोधी आहे. तसेच प्रतीवादींनी त्या बचावाचे पुष्ठर्थ काहीही साक्षीपुरावा या कामी दाखल न केलेने तो बचाव मान्य करता येणार नाही.

१३) प्रतिवादींनी कैफियतीत पुढे असा बचाव घेतला आहे की, वादीने दावा मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा योग्य रितीने दिलेले नाही. वाद मिळकतीचे दिनांक १२/१०/१९८८ रोजी वाटप झालेले असलेने, वादीस वाटपासाठी दावा दाखल करणेचा अधिकार नाही. तसेच वादीने प्रतिवादींना कधीही वाटपाची नोटीस दिलेली नाही. परंतु प्रतीवादींनीही दावा मिळकतीचे निश्चीत वर्णन व चतु:सिमा दाखल करुन, वादीने केलेले वर्णन चुकीचे असलेचे सिध्द केलेले नाही. प्रतीवादींनी दिनांक १२/१०/१९८८ रोजी वाद मिळकतीचे वाटप झालेचा बचाव घेतला. परंतु ते वाटप कोणत्या मिळकतीचे व कशा पध्दतीने झाले, कोणास कुठला व किती हीस्सा कुठल्या बाजुने वाटपास आला, याबाबत काहीही स्पष्टीकरण केलेले नाही. प्रतीवादींनी त्यांचे म्हणनेचे पुष्ठर्थ कोणी साक्षीदार किंवा त्यांची स्वत:ची साक्षही या कामी नोदंवलेली नाही. यावरुन वादीची साक्ष व प्रतीवादी क्र. १ ते ५ यांनी घेतलेला बचावच वाद मिळकती, या

वादी—प्रतीवादींच्या वडीलार्जीत मिळकती असलेचे व वाद मिळकतीचे आद्याप पर्यंत वाटप झाले नसलेचे निष्कर्षाप्रत येणेस पुरेशा आहेत. सबब वाद मिळकती या वादी—प्रतीवादींच्या वडीलार्जीत मिळकती असलेचे व त्या मिळकतींचे आद्याप पर्यंत वाटप झाले नसलेचे म्हणता येईल.

१४) दावा कलम **१ ड** या मधील नमुद ट्रॅक्टर ही मिळकत अस्तीत्वात असलेबाबतचा काहीही पुरावा, वादीने या कामी दाखल केलेला नाही. परंतु प्रतीवादींनी त्यांचे कैफीयतीत ते वाहन प्रतीवादी क्र. १ ते ५ यांनी स्वकमाईतुन घेतलेचे कथन केलेले आहे. यावरुन दावा कलम **१ड** मधील नमुद ट्रॅक्टर अस्तीत्वात असलेचे म्हणता येईल. सबब वादीने त्या वाहनाबाबत कागदोपत्री पुरावा म्हणजेच, ते वाहन कोणी व केंव्हा खरेदी केले. त्याची किंमत कशी व कोणी दिली. ती किंमत सामुहीक दिली किंवा वैयक्तीक रीत्या दिली. त्याची दावा दाखल करतेवेळी किती किंमत होती. त्या बाबतचा वादीने काहीही स्पष्ट पुरावा दाखल न केलेने, वादी त्या मिळकतीचा मागणी केलेप्रमाणे हिस्सा मिळणेस पात्र नसलेचे म्हणता येईल.

१५) प्रतीवादींनी त्यांचे कैफीयतीत घेतलेला बचाव की, वादीचे वडील रामकृष्ण व प्रतिवादी कं. १,२,३,४ व ५ हे सख्खे सावत्र भाऊ आहेत. वादीचे वडील मुंबई येथे पोलिस खात्यात नोकरीस असल्याने त्यांचे सोबत प्रतिवादी क्र. ८,९ व १० हे राहात होते. ते कधी इंदोली गांवी रहाणेस आले नाही. वादी व प्रतिवादी कं. ८ ते १० हे कधीही एकत्र

कुटूंबात राहिले नाहीत. तसेच गेल्या ५० वर्षा पासून प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांची वाद मिळकतीत कब्जे वहिवाट असल्याने, वादीचा वाद मिळकतीत कायदेशीर अधिकार राहिलेला नाही. दावा कलम १अ,ब,क,ड यात नमूद असलेल्या शेत जमिनी, घर मिळकती, ट्रॅक्टर हे प्र.वादी क्रं. १ ते ५ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती असलेने, त्या मिळकतीचे वादीस वाटप करुन मागता येणार नाही. असा बचाव घेतलेला आहे.

१६) परंतु कैफीयतीत नमुद बचावाचे पृष्ट्यर्थ प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी त्यांचा स्वतःचा साक्षीपूरावा नोंदविणे आवश्यक होते. किंवा त्यांचे बचावाचे पृष्टयर्थ एखादा साक्षीदार किंवा कागदोपत्री पूरावा दाखल करणे आवश्यक होते. परंतू त्यांनी वाद मिळकतीचे वाटप झाले बाबत किंवा त्यांचे कैफियतीत नमूद मिळकती हया स्वकष्टार्जीत असल्या बाबत काहीही पूरावा दाखल केलेला नाही. त्याबाबत **<u>माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ए. आय.आर १९९९ सुप्रिम कोर्ट १४४१ मधील विदयाधर वि. माणिकराव मधील प्रमाणक व माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे २००४ (४) ऑल. एम.आर. १५ मधील देशराम लखीराम जुनेजा वि. मोहम्मद ईसाक शेख ईस्माईल व इतर या प्रमाणकांचे अवलोकन केले असता त्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने व माननीय मुंबई उच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, जो पक्षकार दाव्यामध्ये हजर होत नाही, शपथेवर साक्ष देत नाही व स्वतःला उलट तपासासाठी साक्षीदाराच्या पिंजऱ्यात हजर ठेवत नाही, अशा पक्षकाराने दाव्यामध्ये नमुद केलेली कथने भारतीय साक्षी पुरावा कायदा, १८७२ चे कलम ११४ नुसार खरी नसल्याचे गृहीत धरता येईल.</u>** सबब प्रतीवादींनी त्यांचे कैफीयतीत दावा कलम १अ ते १ड म्हणजेच वाद

मिळकती या एकत्र कुटुंबाच्या नसुन स्वकष्टार्जीत असलेचा बचावाचे पुष्ठर्थ त्या मिळकतींचे खरेदीपत्र किंवा इतर काहीही मौखीक किंवा कागदोपत्री पुरावा या कामी दाखल केलेला नाही. प्रतीवादींनी त्यांची स्वत:ची शपथेवर साक्षही या कामी नोदंवलेली नाही. यावरुन प्रतीवादी क्र. १ ते ५ यांचा घेतलेला बचाव खरा व बरोबर असलेचे म्हणता येणार नाही.

१७) वादीने या कामी नोदंवलेली त्याची शपथेवरील साक्ष व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, वाद मिळकती १अ ते १क या वादी व प्रतीवादींच्या वडीलार्जीत मिळकती असलेचे म्हणता येईल. कारण त्यासंदर्भात वादीने नोदंवलेला सर्व साक्षीपूरावा विना आव्हानीत राहिलेला आहे. तसेच वादीने दाव्यात मागणी केलेप्रमाणे वाद मिळकतीचे वाटप झाले नसलेचे दिसुन येते. सबब दावा कलम १अ ते १ड या मिळकती पैकी, दावा कलम १ ड वगळुन इतर मिळकतीत वादीचे वडिलांना कायदेशीर १/६ हिस्सा असलेचे निष्कर्षाप्रत येऊन, त्या पैकी वादी १/४ हिस्सा मिळणेस पात्र असलेचे म्हणता येईल.

१८) वादीने त्याचे साक्षी दरम्यान प्रतिवादी कं. ८ व १० यांनी वाद मिळकतीमधील त्यांना मिळणारे हिस्याचा हक्क सोडले बाबतची कथने केलेली आहेत. परंतू त्या कथनाचे पृष्टयर्थ, वादीने कोणताही कागदोपत्री पूरावा या कामी दाखल केलेला नाही. सबब प्रतिवादी ८ व १० यांनी दावा मिळकती मधील त्यांचा मिळणारा हिस्सा सोडून दिल्याचे म्हणता येणार नाही. सबब वाद मिळकती पैकी, वादीचे वडिल रामकृष्ण यांचे १/६ हिश्या पैकी फकत १/४ हिस्सा मिळणेस वादी पात्र असल्याने,

मूद्दा क्रमांक १ व २ चा निष्कर्ष मी अशंतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ व ४ बाबतः–</u>**

१९) वादीने दावा दाखल केले नंतर प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल केली आहे. परंतु कैफियतीत नमुद कथनाचे पृष्ठर्थ काहीही तोंडी किंवा कागदोपत्री पूरावा या कामी दाखल न केलेने, वादीने केलेली मागणी रास्त व कायदेशीर असल्याचे, निष्कर्षाप्रत येवून वादीचा दावा खर्चासह खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो. सबब मूद्दा क्रमांक ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

२०) वादीचा सर्व साक्षीपुरावा विना आव्हानीत राहीलेने, वाद मिळकती पैकी दावा कलम १ड व्यतीरीक्त सर्व मिळकती या वादी प्रतीवादींच्या वडीलोत्पार्जीत असलेचे स्पष्ट होते. सबब वादी सह इतर प्रतिवादी देखील वाद मिळकती मधील असलेला त्यांचा कायदेशीर हिस्सा वेगळा व तुटक होऊन मिळणेस पात्र आहेत. परंतु त्यासाठी त्यांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात भरणे आवश्यक आहे. सबब आदेश.

## <u>:: आदेश ::</u>

१. वादीचा दावा अशंतः खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. दावा मिळकती पैकी दावा कलम **१ अ** ते **१ क** मधील १/६ हिस्सा वादीचे वडीलांना येतो. सबब वादीचे वडीलांना येणारे

हिस्यापैकी १/४ हिस्सा मिळणेस वादी पात्र असलेने, वाद मिळकती पैकी १/६ हिस्सा वेगळा करुन, त्यापैकी वादीस १/४ हिस्सा मा. जिल्हाधिकारी सातारा यांनी किंवा त्यांचे वतीने नियुक्त केले राजपत्रीत अधिकारी यांनी वेगळा व तूटक करून द्यावा.

३. वाद मिळकती पैकी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे प्रमाणे घर मिळकतीचा हिस्सा कोर्ट कमिशन यांची नियुक्ती करून वादीस वेगळा व तूटक करून द्यावा व त्याबाबतचा अहवाल न्यायालयात दाखल करावा.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अंतर्गत आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी, आदेशाची प्रत मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे पाठविणेत यावी.

५. येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करणेत यावा.

६. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात वाचुन जाहिर केला.

ठिकाण : कराड
तारीख : २९/०२/२०१२.

(श.सं. धपाटे)
सहावे दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कराड.

(सौ. एम.एच.नामदास)
लघुलेखक.